पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८, सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक सा.प्र.वि/२/कावि/३०५/२०२४
दिनांक ०८/०६/२०२४

**विषय :-आषाढीवारी पालखी सोहळा सन २०२४**
**पालखी मार्गावरील करावयाचे कामकाजाबाबत...**

**आदेश,**

जगद्गुरु संत तुकाराम महाराज व संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखीचे आगमन अनुक्रमे दि.२९/०६/२०२४ व दि. ३०/०६/२०२४ रोजी पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये होणार आहे. त्याअनुषंगाने पालखी मुक्कामासंबंधी नियोजन व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत पालखी सोहळ्याचे अनुषंगाने इतर तत्सम सेवा सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात आहेत.

जगद्गुरु संत तुकाराम महाराज व संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी संबंधी नियोजन, आपत्कालीन नियंत्रण तसेच महापालिकेशी संबंधीत तद्अनुषंगिक कामकाजासंदर्भात पालखी मार्गाची पाहणी तसेच कामकाजाचा आढावा घेतला असता या आदेशा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये नमूद केलेल्या त्रृटी मला आढळून आल्या आहेत. या त्रृटींची/कामकाजाची संबंधित विभागाचे विभागप्रमुखांनी ८ दिवसांत तात्काळ पुर्तता करावयाची असून त्याबाबतचा अहवाल खालील समन्वय अधिका-यांमार्फत आयुक्त यांच्या कडे सादर करावा.

| अ.क्र | समन्वय अधिका-यांचे नावं व पदनाम | पालखीचा तपशिल |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | श्री. प्रदिप बापूराव जांभळे पाटील,<br>अतिरिक्त आयुक्त-१, | जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी |
| २ | श्री.विजयकुमार एकनाथ खोराटे,<br>अतिरिक्त आयुक्त-२ | संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी |

सदर कामकाजासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ संबंधित क्षेत्रीय कार्यालयामार्फत/विभागामार्फत उपलब्ध करुन देण्यात यावे. तसेच पालखी सोहळ्याचे अनुषंगाने वरील समन्वय अधिकारी यांनी पालखी सोहळा कालावधीत येणारे भाविकांना सर्व सेवा सुविधा देणेबाबतचे कामकाजाचे नियोजन सर्व विभागप्रमुखांच्या मदतीने करावे.

सही/-
(शेखर सिंह)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

प्रति, सर्व संबंधित अधिकारी / विभाग
प्रत : माहिती व जनसंपर्क विभाग

(विठ्ठल जोशी)
उप आयुक्त (सा.प्र.वि),
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

C:\Users\Lenovo\Desktop\palkhi.docx

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
# संत तुकाराम महाराज पालखी मार्गाचा "पाहणी अहवाल"

## प्रपत्र अ

| अ क्र | ठिकाण | अडचण | उपाय योजना | संबंधित विभाग |
|---|---|---|---|---|
| १ | पुना गेट | रस्त्याच्या कडेला खड्डे आहेत त्यात पावसाचे पाणी साठते. | मुरुमाने सदर खड्डे भरणे व समतल करणे | हद्दी बाहेरील काम सदर काम **BRTS** प्रकल्प विभागाने करणे |
| २ | सर्विस रोड डिफेन्स जागेच्या बाजूला | रस्त्याचा भाग खराब आहे | सदर ठिकाणी खराब भाग काढून व्यवस्थित डांबरीकरण करणे | **BRTS** प्रकल्प विभाग |
| ३ | डिफेन्स प्रॉपर्टी | सर्विस रोडच्या बाजूला भिंत धोकादायक स्थितीत | डिफेन्स विभागास विचारणा करुन दुरुस्ती करणे | |
| ४ | अण्णाभाऊ साठे स्मारक | अण्णाभाऊ साठे स्मारक डावीकडील वळण, सदर ठिकाणी पाणी साठते | चेंबरचे छिद्र स्वच्छ करावे व ओपनिंग वाढवावेत. | **BRTS** प्रकल्प विभाग |
| ५ | पुलाचा गोलाकार भाग | **storm water/** गटारे चोकअप आहेत | सदर गटारे साफ करावीत. | आरोग्य विभाग, अ क्षेत्र |
| ६ | कृष्ण मंदिराच्या नाल्याजवळील पुण्याकडील बाजू | सदर ठिकाणी पावसाचे पाणी साठते. | सदर ठिकाणी साठत असलेल्या पावसाच्या पाण्याचा निचरा नाल्यात होण्यासाठी मार्ग तयार करणे. | **BRTS** प्रकल्प विभाग |
| ७ | मेहता हॉस्पिटल समोर | रस्त्याच्या कडेची उघडी गटारे, क्रॉसकट गटारे चोकअप आहेत. | सदर गटारे साफ करावीत जेणेकरुन पाण्याचा व्यवस्थित निचरा होईल. | आरोग्य विभाग, अ क्षेत्र |
| ८ | निगडी चौक | पावसाचे पाणी साठते. | सदर ठिकाणच्या, पाण्याचा निचरा होणारी यंत्रणा साफ करणे. | आरोग्य विभाग, अ क्षेत्र |
| ९ | हनुमान मंदिरा समोर (मदर टेरेसा पूलाखाली) | पावासाचे पाणी साठते. | सदर ठिकाणी नवीन चेंबर बांधून जवळच्याच स्टॉर्म वॉटर ड्रेनला जोडणे. | **BRTS** प्रकल्प विभाग |
| १० | फॅशनेक्स्ट समोर | पावासाचे पाणी साठते. | सदर ठिकाणी चेंबरची छिद्रे मोकळी करणे तसेच रस्त्याच्या कडेची गटारे साफ करणे. | **BRTS** प्रकल्प विभाग<br>आरोग्य विभाग, अ क्षेत्र |
| ११ | खराळवाडी जनता चारकोल डेपोसमोर | खराळवाडी नाला हा वरच्या बाजूस चोकअप आहे. जर पाऊस असेल तर आंबेडकर चौकातून पाणी या सखल भागात येते. | खराळवाडी नाला वरच्या बाजूस पूर्णपणे स्वच्छ करणे. रस्त्यावरील पाण्याचा त्वरीत निचरा होणेकामीची यंत्रणा स्वच्छ करणे. | आरोग्य विभाग, क क्षेत्र |

| अ क्र | ठिकाण | अडचण | उपाय योजना | संबंधित विभाग |
|---|---|---|---|---|
| १२ | यंशवंतराव चव्हाण पुतळ्या समोर | सदर ठिकाणी पावसाचे पाणी साठते तसेच तेथील स्टॉर्म वॉटर ड्रेन चोकअप आहे. पावसात सर्व रस्त्यांवरील पाणी येथे जमते. | स्टॉर्म वॉटर ड्रेन साफ करणे. सदर स्टॉर्म वॉटर ड्रेन कोठे जोडले आहे याचा शोध घेऊन ते पुर्णपणे साफ करणे. | आरोग्य विभाग, ह क्षेत्र |
| १३ | नाशिक फाटा चौक | सदर भाग सखल आहे. जोराचा पाऊस झाल्यास सर्व रस्त्यांवरील पाणी या भागात येते. पुरसदृश्य स्थिती निर्माण होते. | मुख्य स्टॉर्म वॉटर ड्रेन साफ करणे. | **BRTS** प्रकल्प विभाग |
| | | | **C.D. Work** स्वच्छ करणे. | आरोग्य विभाग, ह क्षेत्र |
| १४ | सॅंडविक नाला | रस्त्यावर पाणी साठते.<br>रस्त्याचा पॅच खराब झालेला आहे. | पाण्याचा निचरा होणारी यंत्रणा साफ करावी.<br>खराब झालेला भाग काढून व्यवस्थित डांबरीकरण करावे. | **BRTS** प्रकल्प विभाग |
| १५ | फुगेवाडी अंडरपास | सदर ठिकाणी पावसाचे पाणी थांबते. | पाण्याचा निचरा होणारी यंत्रणा साफ करावी. **Entry Openings** मोठे करावेत. **BRTS** स्टॉप जवळील क्रॉस पाईप्स साफ करावेत. | **BRTS** प्रकल्प विभाग |
| १६ | **CME** गेट समोर, दापोडी | सदर ठिकाणी पावसाचे पाणी साठते. | डिवायडरच्या वरच्या बाजूच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी व्यवस्था करावी.<br>रणगाड्या जवळील भागातील पाण्याचा निचरा होण्यासाठी चेंबर बांधून ते जवळील स्टॉर्म वॉटर ड्रेनला जोडावे. | **BRTS** प्रकल्प विभाग |
| १७ | मुळा नदी नजिकचा अंडरपास | सदर ठिकाणी पावसाचे पाणी साठते. | पावसाच्या पाण्याला मार्ग करावा. | **BRTS** प्रकल्प विभाग |
| १८ | हॅरीस ब्रिज | सदर ब्रिजवर अनावश्यक झाडे वाढलेली आहेत. | सदर झाडे समुळ काढून टाकावीत. | **BRTS** प्रकल्प विभाग |
| १९ | भक्ती शक्ती चौक ते हॅरीस ब्रिज | कॉंक्रीट रोडच्या बाजूचे मधली उघडी गटारे, क्रॉसकट गटारे ही माती, फुले, पाने इत्यादींनी चोकअप झालेली आहेत. | सदर सर्व गटारे त्वरीत साफ करावीत. तसेच, पावसाळ्याच्या दिवसांतही ते गटारे स्वच्छ राहतील याची दक्षता घ्यावी. | आरोग्य विभाग, अ क्षेत्र, फ क्षेत्र आणि ह क्षेत्र |
| २० | मधुकर पवळे पुतळा चौक | जोरात पाऊस असेल तर चढाच्या बाजूने सर्व रस्त्याने पाणी टिळक चौकात येते. | स्टॉर्म वॉटर यंत्रणा स्वच्छ ठेवावी. | आरोग्य विभाग, स्थापत्य विभाग - अ क्षेत्र |
| २१ | गोकुल स्वीट्सचा पुढील रस्ता | गोकुळ स्वीट्सच्या पुढे लवन **(SAG)** आहे. पावसात तेथे पाणी साठते. | स्टॉर्म वॉटर यंत्रणा स्वच्छ ठेवावी. | आरोग्य विभाग, स्थापत्य विभाग - अ क्षेत्र |

| अ क्र | ठिकाण | अडचण | उपाय योजना | संबंधित विभाग |
|---|---|---|---|---|
| २२ | सेंट उर्सुला शाळेच्या मागे कमानीजवळ | सदर कमानीतून आकुर्डीमध्ये जाताना उजवा भाग हा उंचावरचा आहे. डावा भाग उताराकडचा आहे. तथापि, जास्त उतार नाही. त्यामुळे अँडव्होकेट वायकर यांच्या कार्यालयापर्यंत दोन्ही बाजूने पावसाचे पाणी कॉंक्रीट रस्त्यावर येते. स्टॉर्म वॉटर ड्रेन यंत्रणा आहे. तथापि, छिद्रे असलेले कव्हर्स असल्याने पाणी आत जाण्यास मर्यादा येते. त्यामुळे जास्त पावसात पुर्णपणे रस्त्यावर पाणी ओढ्यासारखे वाहते. अँडव्होकेट वायकर यांच्या घरापासून पुढे चढ लागतो. त्यामुळे त्या तेथून पाणी डाव्या बाजूच्या गल्ल्यांमधून पुढे जाते. वस्तुत: तेथे त्या भागातून खाली नाला असणे अपेक्षित होते. | स्टॉर्म वॉटर यंत्रणा स्वच्छ ठेवावी. **Entry Points** ची साईज वाढवावी. | आरोग्य विभाग, स्थापत्य विभाग - अ क्षेत्र |
| २३ | विठ्ठल मंदिराच्या समोर | विठ्ठल मंदिराच्या समोर उताराचा रस्ता आहे. तथापि, उजव्या बाजूला थोडा उतार आहे. तेथे छिद्रे असलेले कव्हर्स आहे. तथापि, त्यांना मर्यादा आहे. | स्टॉर्म वॉटर यंत्रणा स्वच्छ ठेवावी. **Entry Points** ची साईज वाढवावी. | आरोग्य विभाग, स्थापत्य विभाग - अ क्षेत्र |
| २४ | आकुर्डी हॉस्पिटल चौक | आकुर्डी हॉस्पिटल चौक हा सखल भागात आहे. त्याच्या शेजारुनच नाला जातो. सदर भागात पाण्याचा निचरा होण्यासाठी यंत्रणा आहे. | स्टॉर्म वॉटर यंत्रणा स्वच्छ ठेवावी. **Entry Points** ची साईज वाढवावी. | आरोग्य विभाग, स्थापत्य विभाग - अ क्षेत्र |
| | | | सदर नाल्यावरील **C.D. Work** स्वच्छ करण्यात यावे. | आरोग्य विभाग - अ क्षेत्र |
| २५ | शितळा देवी चौक | चढाच्या बाजूने पाणी वेगाने येते. | स्टॉर्म वॉटर यंत्रणा स्वच्छ ठेवावी. **Entry Points** ची साईज वाढवावी. | आरोग्य विभाग, स्थापत्य विभाग - अ क्षेत्र |
| २६ | पालखी मार्गावर / शहरात सर्वत्र | पालखी मार्गावर / शहरात ब-याच ठिकाणी चिकन व मटण दुकाने तसेच दारुची दुकाने / बार आहेत. | पालखी मार्गावरील / शहरातील सर्व चिकन व मटण दुकाने तसेच दारुची दुकाने / बार पालखी शहराबाहेर जाईपर्यंत बंद ठेवावीत. | परवाना विभाग, **Excise** विभाग |

| अ क्र | ठिकाण | अडचण | उपाय योजना | संबंधित विभाग |
|---|---|---|---|---|
| २७ | सर्व मुता-या व स्वच्छतागृहे | | पालखी मार्गावरील सर्व मुता-या व स्वच्छतागृहे स्वच्छ करावीत. सदर ठिकाणी पुरेश्या पाण्याची व्यवस्था करावी. तसेच, पालखी शहराबाहेर जाईपर्यंत ही व्यवस्था व्यवस्थित राहील याची दक्षता घ्यावी. | आरोग्य विभाग |

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
## संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गाचा "पाहणी अहवाल"

### प्रपत्र अ

| अ क्र | ठिकाण | अडचण | उपाय योजना | संबंधित विभाग |
|---|---|---|---|---|
| १ | दुर्वांकुर लॉन्स, भोसरी पुढील पाईप कलव्हर्ट | सदर पाईप कलव्हर्ट चोकअप आहे. वरील भाग काही प्रमाणात स्वच्छ केला होता. तथापि, सदर भागात परत घाण अडकलेली आहे. पाईपचा **Down Stream** भाग स्वच्छ न केल्यामुळे चोकअप तसेच आहेत. | सदर पाईप कलव्हर्ट पुर्णपणे स्वच्छ करणेत यावा. | आरोग्य विभाग-इ क्षेत्र |
| | | सदर पाईप कलव्हर्टच्या **Up Stream** बाजूकडील **Shoulder** वरील माती/मुरुम वाहून गेल्याने धोकादायक परिस्थिती. पुढील पावसात अजून वाहून गेल्यास रस्ता खचण्याची शक्यता. | सदर साईड पट्टीमध्ये मुरुम/जीएसबी/डब्लूबीएम करुन रस्ता समतल करावा. | |
| २ | गजानन महाराज मंदिराजवळील टाकीसमोरील रस्ता, दिघी | सदर ठिकाणी सखल भाग असल्याने पावसाचे पाणी साठून राहते. | पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी त्याला असणारा मार्ग स्वच्छ ठेवावा. | आरोग्य विभाग-इ क्षेत्र |
| ३ | दिघी मॅगझिन चौक, जायका चहासमोर | पाण्याचा निचरा होण्याची यंत्रणा आहे. तथापि, सदर यंत्रणेचे **Opening** छोटे आहे.<br>रस्त्यावरील पाण्याचा त्वरीत निचरा होण्यासाठी चेंबरवर टाकलेल्या लोखंडी जाळयांचा खालचा भाग धोकादायक स्थितीत गंजलेला आहे. | सदर **Opening** मोठे करावे.<br>सदर खराव जाळी काढून नवीन योग्य क्षमतेची जाळी त्वरीत बसविण्यात यावी. | **BRTS** प्रकल्प विभाग |
| ४ | जायका चहासमोर सेंट्रल आयलंड | रस्त्यावरील पाणी जाण्यासाठी **Vertical Opening** आहे. तथापि, सदर **Opening** समोरच केबलचा चेंबर बांधल्याने सदर **Opening** छोटे झालेले आहे. त्यामुळे ते लवकर चोकअप होते व पाणी साठते. | सदर **Opening** मोठे करण्यासाठी तिरपा पाईप टाकावा. | **BRTS** प्रकल्प विभाग |
| ५ | सेंट्रल आयलंडच्या पुढील भोसरी रस्त्यावरील डिवायडर | सदर ठिकाणी सखल भागात **Opening** नसल्यामुळे तेथे पाणी साठते. | सदर सखल भागातून पाण्याचा निचरा होणेकामी डिवायडरला १ फूट रुंदीचे **Opening** करणे. | **BRTS** प्रकल्प विभाग |

| अ क्र | ठिकाण | अडचण | उपाय योजना | संबंधित विभाग |
|---|---|---|---|---|
| ६ | दिघी मॅगझिन चौकापासून आळंदीकडे जाताना ७० मी. अंतरावर | पावासाचे पाणी साठते. | सदर ठिकाणी स्टॉर्म वॉटर ड्रेन चेंबर आहे. पाण्याचा व्यवस्थित निचरा होईल असे पहावे. | **BRTS** प्रकल्प विभाग |
| ७ | ग्याणबा सोपानराव मोजे विद्यालयाकडे जाणा-या रस्त्यावर | सदर ठिकाणी सखल भाग असल्याने पाणी साठते. **Entry Points** छोटे असल्याने वारंवार चोकअप होतात. | सदर ठिकाणी स्टॉर्म वॉटर ड्रेन साफ करावेत. तसेच, त्याचे **Openings** मोठे करावे. | **BRTS** प्रकल्प विभाग |
| ८ | दिघी-आळंदी रस्त्याच्या कडेने, डिवाडरमध्ये असलेली उघडी गटारे, क्रॉसकट गटारे | सदर गटारे पालापाचोळा, गवत, कचरा यांनी भरल्यामुळे चोकअप आहेत. | सदर सर्व गटारे स्वच्छ करावीत. तसेच, पावसाळ्यातही सर्व गटारे स्वच्छ राहतील याची दक्षता घ्यावी. | आरोग्य विभाग-इ क्षेत्र |
| ९ | श्री बालाजी मंदिराच्या पुढचा चौक, साईबा अमृततुल्य समोर | सदर ठिकाणी सखल भाग आहे. त्यामुळे पावसाचे पाणी साठते. मोठा पाऊस झाल्यास सदर ठिकाणी पूरसदृश्य स्थिती निर्माण होते. | पाण्याचा निचरा होणारा यंत्रणा आहे. तथापि, **Opening** मोठे करणे आवश्यक आहे. | **BRTS** प्रकल्प विभाग |
| १० | संकल्प गार्डन समोर | रस्त्याच्या कडेच्या गटारांचे नाल्यात जाणारे **Opening** पुर्णपणे चोकअप आहे. | सदरचे गटार साफ करणेत यावे. पावसाळ्यातही ते साफ राहील याची दक्षता घ्यावी. | आरोग्य विभाग-इ क्षेत्र |
| ११ | डिवायर मधील, पाण्याचा निचरा होण्यासाठीचे **Openings.** | सदर **Openings** ची रुंदी कमी असल्यामुळे ते लवकर चोकअप होतात. तसेच, सदर **Openings** मध्ये काही ठिकाणी पिंपळ, वडाची झाडे उगवलेली आहेत. | सदर **Openings** किमान १ फुटाचे असावेत. | **BRTS** प्रकल्प विभाग |
| | | | सदर **Openings** स्वच्छ करण्यात यावेत. | आरोग्य विभाग- इ क्षेत्र |
| १२ | तापकीर चौक (श्री वाघेश्वर अमृततुल्य | चौकातील पुण्याकडील बाजू सखल आहे. सदर ठिकाणी पावसात पुरसदृश्य स्थिती निर्माण होते. | पाण्याचा निचरा होणारा यंत्रणा आहे. तथापि, **Opening** मोठे करणे आवश्यक आहे. तसेच, स्टॉर्म वॉटर ड्रेन स्वच्छ करावेत. | **BRTS** प्रकल्प विभाग |
| | | सदर चौकातील अलकापुरम सोसायटीकडील बाजूचा रस्ता खराब झालेला आहे.पावसाळ्यात तो अजून खराब होईल. | रस्त्याचा सदर भाग काढून व्यवस्थित डांबरीकरण करावे. | |
| १३ | संत तुकाराम महाराज पुतळयाजवळील नाला | नाल्याच्या वरच्या बाजूला सडक्या वासाचा घनकचरा तसेच इतर घनकचरा मोठ्या प्रमाणात टाकलेला आहे. **(G.V.P.)** | सदर घनकच-याची त्वरीत विल्हेवाट करण्यात यावी. या ठिकाणी परत घनकचरा टाकला जाऊ नये यास्तव कार्यवाही करावी. | आरोग्य विभाग-इ क्षेत्र |
| | | सदर नाल्याच्या **C.D. Work** मध्ये कचरा आहे. | सदर **C.D. Work** स्वच्छ करावा. | |
| | | सदर नाल्याकडे येणारे स्टॉर्म वॉटर ड्रेन्स चोकअप आहेत. | सदर स्टॉर्म वॉटर ड्रेन्स स्वच्छ करावेत. | **BRTS** प्रकल्प विभाग |

| अ क्र | ठिकाण | अडचण | उपाय योजना | संबंधित विभाग |
|---|---|---|---|---|
| १४ | च-होली फाटा तुर ग्लास समोर | स्टॉर्म वॉटर ड्रेन्सच्या चेंबरची छिद्रे बुजून गेल्याने तेथे पावसाचे पाणी साठते. | सदर चेंबरची छिद्रे स्वच्छ करावीत व पावसाळयातही सदर छिद्रे स्वच्छ राहतील याची दक्षता घ्यावी. | आरोग्य विभाग-इ क्षेत्र |
| १५ | चोविसावाडी फाट्याच्या अलीकडे डावी बाजू | सदर ठिकाणी उघड्या गटारात घनकचरा मोठ्या प्रमाणात टाकलेला आहे. **(G.V.P.)** | सदर घनकच-याची त्वरीत विल्हेवाट करण्यात यावी. या ठिकाणी परत घनकचरा टाकला जाऊ नये यास्तव कार्यवाही करावी. | आरोग्य विभाग-इ क्षेत्र |
| १६ | गुरुकृपा मंगल कार्यालयाजवळील/चौधरी धाब्याजवळील नाला | नाल्याच्या वरच्या बाजूला मोठ्या प्रमाणात टाकलेला आढळून आला. तसेच, मोठ्या प्रमाणात झाडे-झुडपे आढळून आली. | सदर घनकच-याची त्वरीत विल्हेवाट करण्यात यावी. या ठिकाणी परत घनकचरा टाकला जाऊ नये यास्तव कार्यवाही करावी.तसेच, नाला आणि **C.D. Work** स्वच्छ करणेत यावा. | आरोग्य विभाग-इ क्षेत्र |
| १७ | कार्निव्हल प्लॅटीनम विकसकाच्या समोर (सॅम डेव्हलपर्स) | सदर ठिकाणी बांधकाम चालू आहे. त्यामुळे माती आणि साहित्य पडून स्टॉर्म वॉटर चेंबरची छिद्रे/ **Vertical Openings** बंद झालेली आहेत. त्यामुळे तेथे पावसाचे पाणी साठते. | सदर ठिकाणी स्वच्छता करुन पाण्याचा व्यवस्थित निचरा होईल असे पहावे. बिल्डरला ताकीद द्यावी. | आरोग्य विभाग-इ क्षेत्र |
| १८ | काटे कॉलनी | सदर ठिकाणी ठिक-ठिकाणच्या रस्त्यांवरुन पाणी आल्याने पुरसदृश्य स्थिती निर्माण होते. सदर ठिकाणचे **Vertical Inlets** छोटे असल्यामुळे, त्यांना अडथळे असल्यामुळे ते लवकर चोकअप होतात. त्यामुळे सदर ठिकाणी पाणी साठते. | **Vertical Entry Points** चे क्षेत्रफळ वाढवावे. त्यात असलेले अडथळे काढून टाकावेत. तसेच, स्टॉर्म वॉटर ड्रेन्स साफ करावीत. | **BRTS** प्रकल्प विभाग |
| १९ | पिसीएमसीच्या हद्दीजवळील सॅनिटरी वेअरचे दुकानासमोर | सदर ठिकाणी पाण्याचा निचरा होण्याची यंत्रणा आहे. तथापि, **Vertical Entry Points** झाडांनी कच-याने चोकअप आहेत.तसेच **Entry Point** ची साईज छोटी आहे. | सदर कचरा, अनावश्यक झाडे-झुडपे त्वरीत काढून टाकावेत. | आरोग्य विभाग-इ क्षेत्र |
| | | | **Entry Points** मोठे करावेत. | **BRTS** प्रकल्प विभाग |
| २० | गारवा बिर्याणी समोर | सदर ठिकाणी स्पीड टेबल जवळ पाणी साठते. पाण्याच्या निचरा होण्याची यंत्रणा आहे तथापि, **Entry Points** ची साईज छोटी आहे. | **Entry Points** मोठे करावेत. | **BRTS** प्रकल्प विभाग |

| अ क्र | ठिकाण | अडचण | उपाय योजना | संबंधित विभाग |
|---|---|---|---|---|
| २१ | च-होली फाटा **BRTS** स्टॉप | सदर स्टॉपच्या जवळ **BRTS** मार्गात स्पीड टेबलजवळ पाणी थांबते. त्यासाठी डांबरामध्ये छोटा चर काढलेला आहे. तथापि, कर्बला पुरेसे **Opening** नाही. त्यामुळे सदर ठिकाणी पाणी साठते. | कर्बला योग्य ते **Opening** करावे. | **BRTS** प्रकल्प विभाग |
| २२ | ओमसाई स्पेशल मिसळ हाऊस | इलेक्ट्रीकल पोलला लागूनच वडाचे झाड मोठे झाले आहे. अशा प्रकारे इलेक्ट्रीकल पोलला लागूनच शहरात ब-याच ठिकाणी झाड-झुडपे वाढलेली आहेत. | सदर झाडे-झुडपे समुळ काढून टाकावीत. | उद्यान विभाग |
| | | सदर ठिकाणी पाणीपुरवठा विभागाचे व्हाल्वचे चेंबर आहे. त्यावरील जाळी योग्य क्षमतेची नाही. त्यामुळे त्यावरुन वाहने गेल्यास जाळी तुटून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. | डिझाईन करुन पुरेशा क्षमतेची **Heavy Vehicle** चे वजन घेणारी जाळी बसवावी. | पाणीपुरवठा विभाग |
| २३ | गुरुकृपा मंगल कार्यालयाजवळील/चौधरी धाब्याजवळील नाला **(Down Stream** बाजू**)** | मोठ्या प्रमाणात घनकचरा आहे. तसेच, झाडे-झुडपे वाढलेली आहेत. | सर्व घनकचरा तसेच झाडे-झुडपे काढून नाल्याला अडथळा होणार नाही याची काळजी घ्यावी. | आरोग्य विभाग-इ क्षेत्र |
| २४ | प्रथमेश वृंदावन समोर | सदर विकसकाने बिल्डींगच्या कामासाठी रस्ते केल्यामुळे स्टॉर्म वॉटर ड्रेन यंत्रणा चोकअप झालेली आहे. त्यामुळे पावसाचे पाणी साठते. | सदर यंत्रणा त्वरीत स्वच्छ करणेत यावी. विकसकास ताकीद द्यावी. | आरोग्य विभाग-इ क्षेत्र |
| २५ | बालाजी फर्निचर समोर | स्टॉर्म वॉटर ड्रेन यंत्रणा चोकअप झालेली आहे. | सदर यंत्रणा त्वरीत स्वच्छ करणेत यावी. | आरोग्य विभाग-इ क्षेत्र |
| २६ | रस्त्याच्या मधील मोठा कॉंक्रीटचा नाला | सदर नाला स्वच्छ आहे. तथापि, नाल्याच्या आरसीसी भिंतींच्या **Weep Holes, Expansion Joints** यामधून वड, पिंपळ, उंबर अशी झाडे उगवलेली आहेत. भविष्यात सदर झाडे मोठी झाल्यानंतर स्ट्रक्चरला धोका निर्माण होईल. | सदर झाडे समुळ काढून टाकावीत. तसेच, भविष्यात अशा प्रकारे झाडे उगवू नयेत म्हणून काळजी घ्यावी. | **BRTS** प्रकल्प विभाग |

| अ क्र | ठिकाण | अडचण | उपाय योजना | संबंधित विभाग |
|---|---|---|---|---|
| २७ | तापकीर चौक | सदर ठिकाणी काही भागात स्टॉर्म वॉटर लाईन नाही.(स्टे असल्यामुळे) त्यामुळे रस्त्यावरील पावसाच्या पाण्याचा निचरा होण्याकरीता चौकात व्यवस्था आहे. | सदर व्यवस्था स्वच्छ करण्यात यावी. | आरोग्य विभाग-इ क्षेत्र |
| २८ | साई मंदिराजवळील अंडरपास | सदर अंडरपासच्या डिफेन्स लँडच्या बाजूस सखल भाग असल्यामुळे पाणी साठते. | सदर पाण्याचा निचरा होण्यासाठी यंत्रणा आहे. यंत्रणा साफ करणे गरजेचे आहे. | आरोग्य विभाग-इ क्षेत्र |
| २९ | दत्तगड नगर, दिघी | दिघीतून विश्रांतवाडीकडे जाताना डाव्या बाजूला मोठा डोंगर आहे. त्या भागात रहिवासी क्षेत्र आहे. पावसात सदर क्षेत्रातील रस्त्यावरुन तीव्र उताराने पावसाचे पाणी मुख्य रस्त्यावर येते. त्यामुळे या रस्त्यावर पुरसदृश्य स्थिती निर्माण होते. स्टॉर्म वॉटर ड्रेनची यंत्रणा फारच अपुरी आहे. हा रस्ता होण्यापुर्वी रस्त्याच्या डाव्या बाजूला नाला सदृश्य गटार समांतर होते. आता मोठ्या कॅचमेंट एरीया मधून येणारे पावसाचे पाणी ड्रेनमध्ये जाण्याकरीता मोठे **Entry Points** नाहीत. छिद्र असलेली झाकणे फारच अपुरी आहेत. तीही बुजलेली आहेत. परवाच्या पावसात वरच्या बाजूने पावसाच्या पाण्याबरोबर दगडे, वाळू, माती मोठ्या प्रमाणात रस्त्यावर आलेले आहेत. | सदर रस्ता ताबडतोब स्वच्छ करणे आवश्यक आहे. | आरोग्य विभाग-इ क्षेत्र |
| | | | सदर रस्त्याच्या कडेचे स्टॉर्म वॉटर त्वरीत स्वच्छ करावे. सदर स्टॉर्म वॉटर जेथे रस्त्याला क्रॉस होऊन नाल्यापर्यंत जात आहे, तो ड्रेन पुर्णपणे स्वच्छ करावा. चेंबरच्या झाकणांची छिद्रे मोठी करावीत, स्वच्छ करावीत. | **BRTS** प्रकल्प विभाग |
| | | | जर वारी तेथून जात असताना पाऊस आला तर उजव्या बाजूचा रस्ता वापरावा. | |
| ३० | मयुर बारच्या विरुध्द बाजूला | स्टॉर्म वॉटर ड्रेन यंत्रणा चोकअप झालेली आहे. अपु-या क्षमतेची आहे. | स्टॉर्म वॉटर ड्रेन यंत्रणा स्वच्छ करावी.**Entry Points** ची साईज वाढवावी. | **BRTS** प्रकल्प विभाग |
| ३१ | पिसीएमसी हद्द संपल्यानंतर/जुन्या जकात नाक्याच्या पुणे बाजूस | पुण्याकडे जात असताना डाव्या बाजूला पुर्वी तलाव होता. सदर तलावातून पाणी उताराकडे जाण्यासाठी अपु-या क्षमतेचा **C.D. Work** आहे. सखल भाग. पाणी वाहून जाण्याची नैसर्गिक यंत्रणा आहे. तथापि, ती चोकअप आहे. | काम हद्दीबाहेरचे आहे. तथापि, सदर ठिकाणी फक्त घनकचरा काढून पाण्याला मार्ग मोकळा करायचा आहे. | आरोग्य विभाग-इ क्षेत्र |
| ३२ | पालखी मार्गावर / शहरात सर्वत्र | पालखी मार्गावर / शहरात ब-याच ठिकाणी चिकन व मटण दुकाने तसेच दारुची दुकाने / बार आहेत. | पालखी मार्गावरील / शहरातील सर्व चिकन व मटण दुकाने तसेच दारुची दुकाने / बार पालखी शहराबाहेर जाईपर्यंत बंद ठेवावीत. | परवाना विभाग, **Excise** विभाग |

| अ क्र | ठिकाण | अडचण | उपाय योजना | संबंधित विभाग |
|---|---|---|---|---|
| ३३ | सर्व मुता-या व स्वच्छतागृहे | | पालखी मार्गावरील सर्व मुता-या व स्वच्छतागृहे स्वच्छ करावीत. सदर ठिकाणी पुरेश्या पाण्याची व्यवस्था करावी. तसेच, पालखी शहराबाहेर जाईपर्यंत ही व्यवस्था व्यवस्थित राहील याची दक्षता घ्यावी. | आरोग्य विभाग |